**अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य**

**औषध विभाग**

**प्रेस नोट**

**दिनांक: १४ ऑक्टोबर २०२६**

**स्थळ:** मुंबई

**औषध उत्पादन व विक्री आस्थापनांच्या तपासणीला गती एप्रिल-मे २०२६ च्या तुलनेत जून ते सप्टेंबर २०२६ मध्ये मासिक सरासरी तपासण्यांमध्ये सुमारे ४.६ पट वाढ, नियामक व अंमलबजावणी कारवाईतही लक्षणीय वाढ**

- एप्रिल - मे २०२६ या दोन महिन्यांच्या कालावधीत उत्पादन आस्थापनांच्या १२० व विक्री आस्थापनांच्या ३४७, अशा एकूण ४६७ तपासण्या (मासिक सरासरी सुमारे २३४).
- जून ते सप्टेंबर २०२६ या चार महिन्यांच्या कालावधीत उत्पादन आस्थापनांच्या ९६५ व विक्री आस्थापनांच्या ३,२९१, अशा एकूण ४,२५६ तपासण्या (मासिक सरासरी सुमारे १,०६४).
- एप्रिल - मे २०२६ मध्ये उत्पादन व विक्री आस्थापनांविरुद्ध अनुक्रमे ७१ व ३६६, अशा एकूण ४३७ नियामक कारवाया; तर जून ते सप्टेंबर २०२६ मध्ये अनुक्रमे १४८ व ९९६, अशा एकूण १,१४४ नियामक कारवाया.
- तपासणी उद्दिष्टपूर्तीचे प्रमाण एप्रिल-मे २०२६ मधील सुमारे २९% वरून जून ते सप्टेंबर २०२६ मध्ये सुमारे १३१% पर्यंत वाढले.
- एप्रिल-मे २०२६ मध्ये ८ Search & Seizure कारवाया (सुमारे ₹१.१२ कोटी), तर जून ते सप्टेंबर २०२६ मध्ये ११५ Search & Seizure कारवाया करून सुमारे ₹१९.११ कोटी किमतीचा औषधसाठा जप्त/प्रतिबंधित. ३३ FIR दाखल करून १४ व्यक्तींना अटक.
- एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या सहा महिन्यांत उत्पादन आस्थापनांच्या १,०८५ व विक्री आस्थापनांच्या ३,६३८, अशा एकूण ४,७२३ तपासण्या, उत्पादन व विक्री आस्थापनांना अनुक्रमे २७३ व १,४०८, अशा एकूण १,६८१ नोटिसा, ३५४ परवाने रद्द (उत्पादन ८६, विक्री २६८) व १,२२७ परवाने निलंबित (उत्पादन १३३, विक्री १,०९४), अशा एकूण १,५८१ नियामक कारवाया; तसेच १२३ Search & Seizure कारवायांमध्ये सुमारे ₹२०.२३ कोटी किमतीचा औषधसाठा जप्त/प्रतिबंधित, ३५ FIR दाखल व १५ व्यक्तींना अटक.

**मुंबई, दि. १४ ऑक्टोबर २०२६ :** अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्यामार्फत राज्यातील औषध उत्पादन व विक्री आस्थापनांवर नियमितपणे तपासण्या करून औषधांची गुणवत्ता, उत्पादन प्रक्रिया, साठवणूक, विक्रीची वैधता तसेच औषधविषयक नियमांचे पालन यांची पडताळणी करण्यात येते. औषधांची गुणवत्ता व नागरिकांची सुरक्षितता यांना सर्वोच्च प्राधान्य देत प्रशासनामार्फत तपासणी व नियामक कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

सन २०२६-२७ च्या पहिल्या दोन महिन्यांच्या (एप्रिल-मे २०२६) तुलनेत जून ते सप्टेंबर २०२६ या चार महिन्यांच्या कालावधीत उत्पादन व विक्री आस्थापनांच्या करण्यात आलेल्या तपासण्या,

बजावण्यात आलेल्या नोटिसा तसेच परवाने रद्द व निलंबित करण्याची कार्यवाही यांची तुलनात्मक आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे:

| तपशील | एप्रिल-मे २०२६ उत्पादन | एप्रिल-मे २०२६ विक्री | एप्रिल-मे २०२६ एकूण | जून-सप्टेंबर २०२६ उत्पादन | जून-सप्टेंबर २०२६ विक्री | जून-सप्टेंबर २०२६ एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **तपासण्या** | १२० | ३४७ | **४६७** | ९६५ | ३,२९१ | **४,२५६** |
| **नोटिसा** | ८९ | १९० | **२७९** | १८४ | १,२१८ | **१,४०२** |
| **परवाने रद्द** | १२ | ५४ | **६६** | ७४ | २१४ | **२८८** |
| **परवाने निलंबित** | ५९ | ३१२ | **३७१** | ७४ | ७८२ | **८५६** |
| **एकूण नियामक कारवाई** | ७१ | ३६६ | **४३७** | १४८ | ९९६ | **१,१४४** |
| **तपासणी उद्दिष्ट** | ४५६ | १,१३५ | **१,५९१** | ९०८ | २,३४० | **३,२४८** |
| **उद्दिष्टपूर्ती (%)** | २६% | ३१% | **२९%** | १०६% | १४१% | **१३१%** |
| **मासिक सरासरी तपासण्या** | ६० | १७४ | **२३४** | २४१ | ८२३ | **१,०६४** |

मासिक सरासरीच्या आधारे तुलना केली असता, एप्रिल-मे २०२६ मध्ये दरमहा सरासरी सुमारे २३४ तपासण्या करण्यात येत होत्या, तर जून ते सप्टेंबर २०२६ मध्ये हे प्रमाण दरमहा सरासरी सुमारे १,०६४ इतके, म्हणजेच सुमारे ४.६ पट वाढले आहे. उत्पादन आस्थापनांच्या मासिक तपासण्या सुमारे ४ पट, तर विक्री आस्थापनांच्या मासिक तपासण्या सुमारे ४.७ पट वाढल्या आहेत. विक्री आस्थापनांच्या तपासणी उद्दिष्टपूर्तीचे प्रमाण एप्रिल—मे २०२६ मधील सुमारे ३१% वरून जून ते सप्टेंबर २०२६ मध्ये सुमारे १४१% पर्यंत, तर उत्पादन आस्थापनांचे प्रमाण सुमारे २६% वरून सुमारे १०६% पर्यंत वाढले आहे.

तपासण्यांसोबतच नियामक कार्यवाहीलाही गती मिळाली आहे. मासिक सरासरीच्या आधारे बजावण्यात आलेल्या नोटिसा दरमहा सुमारे १३९.५ वरून ३५०.५ (२.५ पट), रद्द करण्यात आलेले परवाने दरमहा ३३ वरून ७२ (२.२ पट), तर एकूण नियामक कारवाया दरमहा सुमारे २१८.५ वरून २८६ इतक्या वाढल्या आहेत. जून ते सप्टेंबर २०२६ या चार महिन्यांत एकूण १,४०२ नोटिसा बजावण्यात आल्या, २८८ परवाने रद्द व ८५६ परवाने निलंबित करण्यात आले.

**अन्न व औषध प्रशासनाच्या अंमलबजावणी कामकाजाची आकडेवारी:**

| कामकाज | एप्रिल-मे २०२६ (२ महिने) | जून-सप्टेंबर २०२६ (४ महिने) | मासिक सरासरीतील वाढ |
|---|---|---|---|
| Search & Seizure | ८ | **११५** | **७.१९ पट** |
| FIR | २ | **३३** | **८.२५ पट** |
| **अटक व्यक्ती** | १ | **१४** | **७.०० पट** |

| | | | |
|---|---|---|---|
| **जप्त / प्रतिबंधित मालाची किंमत** | ₹१.१२ कोटी | **₹१९.११ कोटी** | **८.५३ पट** |

अन्न व औषध प्रशासनाच्या अंमलबजावणी कामकाजातही उल्लेखनीय वाढ झाली आहे. एप्रिल-मे २०२६ च्या मासिक सरासरीच्या तुलनेत जून ते सप्टेंबर २०२६ मध्ये Search & Seizure कारवायांमध्ये सुमारे ७.२ पट, FIR नोंदणीमध्ये सुमारे ८.२ पट, तर जप्त/प्रतिबंधित मालाच्या किमतीमध्ये सुमारे ८.५ पट वाढ झाली आहे. जून ते सप्टेंबर २०२६ मधील कारवायांमध्ये विनापरवाना औषधसाठा व विक्री (४३ कारवाया), औषधे व जादूटोणा उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम, १९५४ अंतर्गत आक्षेपार्ह जाहिराती (३१), बनावट औषधे व सौंदर्यप्रसाधने (१४), मिसब्रँडेड सौंदर्यप्रसाधने (१०), गुंगीकारक औषधांच्या गैरवापराविरुद्ध NDPS कायद्यांतर्गत कारवाई (९), वैद्यकीय उपकरणे (३), फसव्या साधर्म्याची ब्रँड नावे (३) व लेबलविषयक उल्लंघन (२) यांचा समावेश आहे.

“नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे ही अन्न व औषध प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे. गेल्या चार महिन्यांत तपासण्यांची संख्या तसेच अंमलबजावणी कारवायांमध्ये झालेली लक्षणीय वाढ ही प्रशासनाच्या सजगतेचे द्योतक आहे. बनावट, निकृष्ट व विनापरवाना औषधांचा बाजारात शिरकाव होऊ नये यासाठी राज्यभर तपासणी मोहीम अधिक व्यापक करण्यात येईल आणि दोषींविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.”

**तुकाराम मुंढे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य**

<u>तात्काळ व्यापक प्रसिद्धीसाठी</u>

**सह आयुक्त (औषधे), मुख्यालय**
**अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य**